# जिल्हा चंद्रपूर : भुसंपादन शाखा

# नागरीकांची सनद

जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत सार्वजनिक हेतु निमित विविध शासकीय प्रकल्पासाठी जमीन भूसंपादन कार्यवाही केल्या जाते.

भूसंपादन कायदा १८९४ हा १ जानेवारी २०१४ पासुन निरस्त करण्यात आला असुन १ जानेवारी २०१४ पासुन भुमीसंपादन, पुनर्वसन, पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंमलात आलेला आहे. या कायदयाअंतर्गत भूसंपादन, पुनर्वसन, सामाजिक परिणाम व मुल्य निर्धारण, सर्वेक्षण इत्यादी बाबत तरतुद आहे.

सद्यस्थितीत जुन्या भूसंपादन कायद्याअंतर्गत जे निवाडे जाहिर झाले आहेत, व ज्यांनी अद्याप मोबदला उचलला नाही, ते हजर झाल्यास नियमानुसार कार्यवाही करून मोबदला अदा करण्यात येतो.

दिवाणी न्यायालयात दाखल संदर्भ १८ मध्ये पारीत निवाडयानुसार, कलम ३० अंतर्गत भागधारकांच्या हिस्सासंबंधी आदेश (निवाडा) पारीत झाल्यानंतर रक्कम अदा करण्यात येते. कलम २८ अ नुसार प्राप्त अर्जावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येऊन निवाडा जाहिर करणे, यंत्रणेकडून निधी प्राप्त करुन मोबदला अदा करणे ही कामे केल्या जातात.

भूसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार ,शासन निर्णय दि. १२ में,२०१५ नुसार खाजगी वाटाघाटी व्दारा यंत्रणेत जमीन खरेदी करण्याची तरतुद निश्चीत केली आहे.

जिल्हास्तरावर मोबदला दर निश्चीती समीती व्दारा दर निश्चीत करण्यात येऊन जिरायत (कोरडवाहू) जमीनीसाठी दर निश्चीत केले जातात. २६ मे २०१५ चे शासन राजपत्रा नुसार चंद्रपूर जिल्हयासाठी गुणक १.५ असुन, १००% सानुग्रह अनुदान, २५% वाढ इत्यादी चा विचार करता निश्चीत केलेल्या दराच्या ३.७५ पट रक्मम थेट खरेदीसाठी यंत्रणेव्दारा मोबदला अदा करण्यात येते.

जिल्हास्तरावर १ भूसंपादन अधिकारी कार्यरत असुन चंद्रपूर जिल्हयातील ८ उविअ (चंद्रपूर/मुल/गोंडपिपरी/ब्रम्हपुरी/राजुरा/चिमुर/बल्लारपूर/वरोरा) यांना भूसंपादन अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यांचे कार्यक्षेत्रातील भूसंपादन कामे संबंधीत उपविभागीय अधिकारी व्दारा करण्यात येतात.

586 Genral Letter